आजचा दिनविशेष
१६६६ : छत्रपती शिवाजी राजाने दख्खनमध्ये प्रवेश करण्यासाठी बनावट कागदपत्रांसह ठाणे येथील नरवीर घाटी पार केली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार २० ऑगस्ट २०२५ | अंक २४२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Touriism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555


# चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांनी घेतली PM मोदींची घेतली भेट, चीन-भारत संबंधांवर झाली चर्चा

## भारत आणि पाकिस्तानमध्ये मध्यस्थी करण्याची ऑफर

भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावपूर्ण संबंध आहेत. अशातच आता चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी चीन भारत आणि पाकिस्तानमध्ये मध्यस्थी करण्यास तयार असल्याचे म्हटले आहे. ची दोन्ही देशांमधील मैत्रीपूर्ण संबंध आणि त्यांच्या समस्या सोडवण्यात सकारात्मक भूमिका बजावू शकतो असं वांग यी यांनी म्हटलं आहे.

चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दिल्लीतील निवासस्थानी भेट घेतली. यावेळी वांग यी यांनी पंतप्रधान मोदींना शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) शिखर परिषदेच्या अजेंडाची आणि चीन-भारत संबंधांमध्ये झालेल्या प्रगतीची माहिती दिली. त्यात बरोबर दोन्ही नेत्यांमध्ये इतरही अनेक महत्वाच्या मुद्यांवर चर्चा झाली. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.भारत आणि अमेरिकेमधील संबंध बिघडले आहेत, त्यानंतर आता चीन आणि भारताचे संबंध सुधारण्यास सुरुवात झाली आहे. चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी काल (सोमवार) भारतात आले आहेत. पंतप्रधान मोदींना भेटण्यापूर्वी त्यांनी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांची भेट घेतली. त्यानंतर संध्याकाळी 6.30 वाजता, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी भेट घेतली.

### पंतप्रधान मोदींनी दिली माहिती

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वांग यी यांच्या भेटीची माहिती देताना X वर लिहिले की, 'परराष्ट्र मंत्री वांग यी यांना भेटून



आनंद झाला. गेल्या वर्षी कझानमध्ये राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या भेटीपासून, भारत-चीन संबंध एकमेकांच्या हितसंबंधांचा आदर करून प्रगती करत आहेत. शांघाय सहकार्य संघटनेच्या (SCO) शिखर परिषदेदरम्यान टियांजिनमध्ये होणाऱ्या आमच्या पुढील बैठकीची मी वाट पाहत आहे. भारत आणि चीनमधील स्थिर, विश्वासू आणि रचनात्मक संबंध प्रादेशिक आणि जागतिक शांततेसाठी आणि समृद्धीसाठी महत्त्वाचे ठरतील.'

### पंतप्रधान मोदी चीनला जाणार

वांग यी यांनी तियानजिन येथे होणाऱ्या एससीओ शिखर परिषदेसाठी पंतप्रधान मोदींना निमंत्रण दिले. त्यामुळे शांघाय सहकार्य संघटनेच्या (SCO) वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान मोदी चीनला जाण्याची शक्यता आहे. पंतप्रधान मोदी 31 ऑगस्ट ते 1 सप्टेंबर दरम्यान चीनला भेट देऊ शकतात. हा दौरा दोन्ही देशांसाठी महत्वाचा असणार आहे.

# 'अतिवृष्टी'मुळे शेतकऱ्यांचे नुकसान, तातडीने पंचनामे करा राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांची मागणी

बीड: बीड जिल्ह्यात मागील सात दिवसांपासून संततधार आणि काही भागात अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. अनेक ठिकाणी नद्यांच्या पात्रातून पाणी बाहेर आले असून शेतातील पिके पाण्यात आहेत.शिवाय जमितीनी खरडून गेल्या असून या नुकसानीचे तातडीने पंचमाने करावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे, बीड जिल्ह्यात मागील सात दिवसांपासून संततधार व काही ठिकाणी अतिवृष्टीने हजेरी



लावली असून सर्वत्रच शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काही भागात पुरपरस्थिती निर्माण झाल्याने जमीन वाहून गेल्या आहेत. तर काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे.याच बरोबर जनावरेही दगावली असून शेतकऱ्यांचे सर्वच बाजुने नुकसान झालेले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना द्याव्यात. शेतकऱ्यांनी देखील आपल्या नुकसानीचे फोटो व व्हिडिओ स्वत:कडे जतन करून ठेवावेत, तसेच नुकसानीबाबतची तक्रार फोटो, व्हीडिओसह तहसीलदार यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर करावी. पंचनामे करून घेण्यासाठी सरपंच आणि गावपातळीवर काम करणाऱ्या मंडळींनी पुढाकार घेवून पंचनामे पुर्ण करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत, पंचनामे झाल्यास मदत मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असेही म्हटले आहे. यावेळी बळीराम गवतेंसोबत राष्ट्रवादीचे महादेव उबाळे, जयराम गित्ते, संदीप उबाळे, सचिन घरत, अनिल चव्हाण, संतोष तांदळे, गुड्डू काळे यांची उपस्थिती होती.

# पुरग्रस्त गावांना मदत द्यावी-संभाजी ब्रिगेड

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट



नांदेड : मुखेड तालुक्यातील हासनाळ,भिंगोली,रावणगा व,मारजवाड,भेंडेगाव या व इतर गावात अति पावसामुळे गावातील नागरिकांना पुरपरिस्थितीला सामोरे जावे लागले आहे.गावातील नागरिकांच्या शेतीचे,घरांचे तर नुकसान झालेच आहे काही नागरिकांचा जीव गेला आहे तसेच म्हैस,गाय,बैल,शेळ्या वाहुन गेल्या आहेत व मृत अवस्थेत सापडल्या आहेत.सध्या नागरिक भयगृस्त आहेत त्यांचे दैनंदिन जीवन चालविण्यासाठीचे पुरेसे धान्य,कपडे वाहुन गेले आहे भिजुन गेले आहेत अशा परिस्थितीत त्यांना पुरेसे अन्न व कपडे मिळणे गरजेचे आहे.तरी मृत नागरिकांच्या कुटुंबियांना दहा लक्ष रूपये आर्थिक मदत द्यावी, नुकसान ग्रस्त शेतकर्यांच्या शेतीच्या नुकसानिचे पंचनामे करून मदत द्यावी,ज्यांची जनावरे मृत पावली आहेत त्यांना आर्थिक मदत तसेच पुरातुन जीव वाचवुन बाहेर आलेल्या नागरिकांना दोन वेळच्या जेवणाची सोय करावी असे निवेदन संभाजी ब्रिगेड च्या वतीने निवासी जिल्हाधिकारी किरण आंबेकर यांना देण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे संकेत पाटील,सुभाष कोल्हे,अशोक कदम,किरण वानखेडे, अंकुश कोल्हे,दिलीप दळवी,शिवाजी हंबर्डे उपस्थित होते.

# बसस्थानक की दलदल? लोकप्रतिनिधी उत्तर देणार का पुन्हा स्वप्नं रंगवणार?"

## विकासाच्या गप्पा अन् चिखलाच्या थापा – वडवणी बसस्थानक उघडं पाडतं खोटं!

वडवणी : लोकपत्रकार भांगे पावसाच्या दोन सरी काय पडल्या आणि वडवणीचं एसटी बसस्थानक अक्षरशः चिखलमहाल झालंय! प्रवासी, विद्यार्थी हातात बूट-चप्पल घेऊन दलदलीतून वाट काढतायत. प्रशासन मात्र नेहमीसारखं डोळ्यावर पट्टी बांधून झोपेत!शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेलं हे बसस्थानक म्हणजे प्रवाशांच्या हाल अपेष्टांची पराकाष्ठा. पावसाचं पाणी थांबतं, चिखल साचतो आणि रस्त्यातून जाणाऱ्यांना अक्षरशः उडवतं.प्रवाशांना बस मिळणं एक, पण बसस्थानकात उभं राहणं हाच मोठा संघर्ष झालाय.विद्यार्थी शाळेत जायला निघतात, पण शाळेत पोहोचण्याआधीच त्यांना



"दलदलीतलं धाडस" करून दाखवावं लागतं. ग्रामीण भागातून येणाऱ्या प्रवाशांना तर यातून सुटका नाही. जनतेचा सवाल :"दर निवडणुकीत विकासाच्या गप्पा झोडणारे लोकप्रतिनिधी या चिखलाच्या अंधाऱ्या गटारात कधी येणार? बसस्थानक दुरुस्ती कधी होणार? की पुन्हा एकदा निवडणुकीच्या तोंडावर डांबरी स्वप्नं रंगवली जाणार?" प्रवासी आणि विद्यार्थी यांची मागणी एकच – बसस्थानक द्या, चिखलस्थानक नको!

# हेमा पिंपळे यांची राष्ट्रवादी (शरद पवार) गटाच्या राज्य प्रवक्ते पदी निवड

बीड /प्रतिनिधी बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या सक्रिय कार्यकर्त्या म्हणून ओळख असलेल्या ॲड. हेमा पिंपळे यांची राज्य प्रवक्ते पदी निवड करण्यात आली आहे. पक्ष संघटनेत सातत्याने काम करत कार्यकर्त्यांचा विश्वास संपादन केलेल्या पिंपळे यांच्या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली. या निवडीसाठी



पक्षाध्यक्ष आदरणीय शरदचंद्र पवार साहेब, खा.सुप्रिया सुळे, ज्येष्ठ नेते जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, राष्ट्रीय प्रवक्ते जितेंद्र आव्हाड तसेच रोहित पवार यांनी मान्यता दिली.या निवडीमुळे बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातील कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे

# बीड: राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

## जिल्हा रुग्णालयात आरोग्य सेवा बंद ठेवून कर्मचाऱ्यांचे काम बंद

बीड प्रतिनिधी :राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समितीच्या माध्यमातून बीडच्या जिल्हा रुग्णालयात बेमुदत काम बंद करून आंदोलन केले जात आहे.. एनएचएम कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासन निर्णयानुसार नियमित शासन सेवेत समायोजन करावे.. या प्रमुख मागणीसाठी हे आंदोलन राज्यभर केलं जातंय. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा रुग्णालयात देखील आरोग्य सेवा बंद ठेवून आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधले आहे. जिल्हा



रुग्णालय परिसरात जोरदार घोषणाबाजी करत कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत काम बंद ठेवण्याचा निर्णय या कर्मचाऱ्यांनी घेतला आहे..

# गेवराई तहसीलदारांचा अजब कारभार ,चक्क लहान मुलांचे श्रावण बाळ योजनेमध्ये लावले नाव, गेवराईच्या तहसीलच्या परिसरात तरुणांचा आक्रोश

## चक्क शाळेतील विद्यार्थ्यांच्या नावावर तहसीलदारला पैसा खायचा आहे का ,बाळासाहेब सोलंनकर



बीड प्रतिनिधी ,अंकुश गवळी गेवराई तालुक्यातील चकला शहाजनपुर या ठिकाणी श्रावण बाळ संजय गांधी योजनेमध्ये लहान मुलांची नावे लावण्यात आल्याचा प्रकार घडला आहे, सदरील प्रकार सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सोलंकर यांना निदर्शनास आला त्यांनी तात्काळ तहसील कार्यालय च्या आवारात तहसील प्रशासनाच्या विरोधात नाराजी व्यक्त केली आहे आणि लहान मुलांची नावे पण या ठिकाणी आहेत, चक्क लहान मुलांच्या नावावर तहसीलदार ला पैसे काहीच आहेत का संतप्त सवाल बाळासाहेब सोलंकर या तरुणांनी केला आहे,

# बीडमधील शेतकरी संकटात; केंद्राकडून मदतीचा हात द्या

## खा.बजरंग सोनवणेंनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून केली मागणी

बीड: बीड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून पाऊस जोरदार हजेरी लावत असून जिल्ह्यामधील बहुतेक सर्वच महसुल मंडळामधे अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. शेतातील पिके पाण्यात आहेत. दोन दिवसांपुर्वी खा.बजरंग सोनवणे यांनी थेट शेतात जावून नुकसानीची पाहणी केली होती. आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची दिल्ली येथे भेट घेवून अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून मदतीचा हा द्या, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली.बीड जिल्ह्यातील शेतकरी बांधवांवर अतिवृष्टीमुळे मोठे संकट ओढावले आहे. राहती घरे, पीक, पशुधन, शेतीजमीन तसेच फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून तातडीने मदत मिळावी, यासाठी खा.सुप्रिया सुळे यांच्या सोबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन



सविस्तर निवेदन सादर केले. मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात संततधार आणि मुसळधार पावसाची नोंद झालेली असून जिल्ह्यातील नद्यांना पूर गेलेला आहे. नदीपात्रापासून एक किलोमीटर अंतरापर्यन्त पिके पाण्याखाली आहेत. पावसामुळे पिकांचे, शेतीचे आणि घरांची पडझड होवूनही मोठी हानी झालेली आहे. केज तालुक्यातील काही गावात मांजरा नदीच्या पात्रातील पाणी शिरले होते. या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे आणि शेतीचेही नुकसान झाले होते. यानंतर तातडीने खा.बजरंग सोनवणे यांनी पूर्वनियोजीत दौरा रद्द करून शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतात जावून पिकांची आणि नुकसानीची पाहणी केली होती. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांनी धीर दिला होता. यानंतर मुख्यमंत्री आणि कृषीमंत्री यांना निवेदन पाठवून पंचनामे करणे व मदतीची मागणी केली होती. आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून केंद्र सरकारच्या वतीने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी केली. दरम्यान, गेल्या ४/५ दिवसांपासून झालेल्या संततधार पावसामुळे बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्रच शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उपजाऊ मातीसह जमीन वाहून गेल्यामुळे पुढील काळासाठी काही क्षेत्र उजाड झाली आहेत. काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे तसेच गुरे दगावले असल्याची माहिती येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. झालेल्या नुकसानीचे फोटो व व्हिडिओ स्वत:कडे जतन करून ठेवावेत, तसेच नुकसानीबाबतची तक्रार फोटो, व्हीडिओसह तहसीलदार यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर करावी. या प्रक्रियेत कुठलीही अडचण आल्यास माझ्या कार्यालयाशी संपर्क साधून मदत घ्यावी, असे अवाहनही खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक यांना केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २० ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## हस्तकलेचे विद्यार्थी जीवनातील फायदे

विद्यार्थी जीवन हे मनुष्याच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचे, संवेदनशील आणि व्यक्तिमत्व घडवणारे आहे. या काळात मुलाचे मानसिक, शारीरिक, बौद्धिक आणि सर्जनशील व्यक्तिमत्त्व आकार घेत असते. पुस्तकांमधील ज्ञान, अभ्यासक्रमातील विषय, शिस्त, संस्कार यांसोबतच सर्जनशीलता ही विद्यार्थ्याच्या जीवनाला एक नवा आयाम देणारी बाब आहे. हस्तकला म्हणजे हातांनी बनवलेली कला. यात रेखाटन, चित्रकला, शिल्पकला, ओरिगामी, विणकाम, मातीची भांडी, पेपर आर्ट, नक्षीकाम, भरतकाम, लाकडी कोरीवकाम, सजावटीच्या वस्तू बनवणे अशा अनेक उपशाखा समाविष्ट आहेत. या कलांद्वारे विद्यार्थी आपले मनोगत व्यक्त करतो, सौंदर्यदृष्टी वाढवतो, आणि नवनवीन कल्पनांना आकार देतो. आजच्या डिजिटल आणि तांत्रिक युगातही हस्तकलेचे महत्त्व कमी झालेले नाही, उलट विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ती एक उपयुक्त साधन म्हणून मान्यता पावत आहे. हस्तकलेची ओळख - "हस्तकला" या शब्दात "हस्त" म्हणजे हात आणि "कला" म्हणजे सर्जनशीलता किंवा अभिव्यक्ती असा अर्थ दडलेला आहे. हस्तकला ही केवळ वेळ घालवण्याची कला नाही तर ती विचार, कौशल्य, धैर्य, सौंदर्यदृष्टी आणि नवकल्पना यांचा संगम आहे. भारतीय परंपरेत हस्तकलेला फार मोठे स्थान आहे. अजिंठा-एलोरा येथील चित्रकला, खजुराहोतील शिल्पकला, बनारसची रेशमी साड्या, मध्यप्रदेशातील गोंड कला, महाराष्ट्रातील वारली चित्रकला, राजस्थानची मीनाकारी, गुजरातचे पटोला विणकाम, ओडिशातील पट्टचित्रे ही सर्व जगभर प्रसिद्ध हस्तकलांची उदाहरणे आहेत. विद्यार्थ्यांना शालेय जीवनात हस्तकलेचा अनुभव दिल्यास त्यांच्यात कला आणि कौशल्याची बीजे रोवली जातात. विद्यार्थी जीवनातील हस्तकलेचे फायदे १. सर्जनशीलतेचा विकास हस्तकलेतून विद्यार्थी आपले विचार रंग, आकार, माती, कागद किंवा धाग्यांच्या माध्यमातून व्यक्त करतो. त्यामुळे त्याची कल्पनाशक्ती बहरते. एखाद्या वस्तूचा नवा उपयोग शोधणे, वेगळा आकार देणे ही सर्जनशीलता विद्यार्थ्याला आयुष्यभर उपयोगी पडते. २. एकाग्रता व लक्ष केंद्रीकरण हस्तकलेच्या कोणत्याही कामासाठी पूर्ण लक्ष, संयम व एकाग्रता आवश्यक असते. रेखाटन करताना, रंग भरताना किंवा शिल्प घडवताना विद्यार्थी संपूर्ण लक्ष कामाकडे देतो. त्यामुळे त्याच्या मनाला स्थिरता मिळते, अभ्यासातही एकाग्रता वाढते. ३. मानसिक तणावाचा निचरा अभ्यास, परीक्षा, स्पर्धा या दडपणामुळे विद्यार्थी तणावग्रस्त होतात. हस्तकला हे तणावमुक्तीचे उत्तम साधन आहे. चित्र रंगवताना किंवा माती काम करताना मन शांत होते, विचार सकारात्मक होतात आणि मानसिक ताजेतवानेपणा अनुभवता येतो. ४. आत्मविश्वासाची वाढ स्वतःच्या हाताने बनवलेली वस्तू पाहून विद्यार्थ्याला अभिमान वाटतो. शाळेत किंवा प्रदर्शनात कौतुक झाल्यास त्याचा आत्मविश्वास दुपटीने वाढतो. हा आत्मविश्वास भविष्यातील आयुष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करतो. ५. सौंदर्यदृष्टीची जोपासना हस्तकलेमुळे विद्यार्थ्याची सौंदर्यदृष्टी विकसित होते. रंगसंगती, रेषांची मांडणी, वस्तूंचे प्रमाण, नक्षीकामातील बारीकसारीक तपशील यामुळे सौंदर्याची जाणीव वाढते. या सौंदर्यदृष्टीचा उपयोग जीवनातील प्रत्येक क्षेत्रात होतो. ६. शारीरिक कौशल्यांचा विकास हस्तकलेमुळे डोळा-हात यांचा समन्वय साधला जातो. सूक्ष्म काम करताना बोटांची पकड मजबूत होते, हालचालींवर नियंत्रण येते. हे कौशल्य अभ्यासासोबतच क्रीडा व इतर उपक्रमांतही उपयुक्त ठरते. ७. सामाजिक भान आणि सहकार्यभावना शाळेत हस्तकला स्पर्धा किंवा गटप्रकल्प होत असतात. यातून विद्यार्थी एकत्र काम करणे, आपल्या मनातील कल्पना सांगणे , एकमेकांची मदत करणे या गोष्टी शिकतात. त्यामुळे त्यांच्यात सामाजिक जाणीव, टीमवर्कची भावना निर्माण होते. ८. आर्थिक स्वावलंबनाची शक्यता सध्याच्या काळात हस्तकला वस्तूंना जगभरातूनच मोठी मागणी आहे. हस्तकलेत कुशल विद्यार्थी स्वतः बनवलेल्या वस्तू विकून आर्थिक कमाई देखिल करू शकतो. भविष्यात हेच कौशल्य त्याला उद्योग, व्यवसाय किंवा उद्योजकता घडवण्याची संधी देते. ९. संस्कृतीची जपणूक हस्तकला ही आपल्या परंपरेचा अविभाज्य भाग आहे. वारली चित्र, फड चित्र, लिप्पन कला, मातीकाम, मूर्तिकाम, बांबूकाम, भरतकाम, शिवणकाम, सुतारकाम या कलांमधून आपल्या सांस्कृतिक वारशाची ओळख पटते. विद्यार्थी जेव्हा या कला शिकतो तेव्हा तो आपल्या संस्कृतीशी जोडला जातो. १०. पर्यावरणपूरक जीवनशैली हस्तकलेत बहुतांश वेळा कागद, माती, लाकूड, कापड अशा नैसर्गिक वस्तूंचा उपयोग होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक सवयी लागतात. प्लास्टिक किंवा अपायकारक वस्तूंपेक्षा नैसर्गिक वस्तूंचे महत्त्व पटते. ११. अभ्यासावरील पूरक परिणाम हस्तकला ही केवळ कला नसून ती विज्ञान, गणित, इतिहास, भूगोल या विषयांशीही संबंधित आहे. रेखाटनातून भूमितीचे आकार समजतात. विणकामातून गणनेची सवय लागते. शिल्पकलेतून इतिहासातील शैलींची माहिती मिळते. यामुळे विद्यार्थ्याला अभ्यास अधिक समजतो व आवड निर्माण होते. १२. व्यक्तिमत्त्व विकास - हस्तकला विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाला चार चाँद लावते. सर्जनशीलता, आत्मविश्वास, संयम, कौशल्य, सामाजिकता, स्वावलंबन या गुणांची वाढ झाल्यास विद्यार्थी एक सर्वांगसुंदर व्यक्ती घडतो.

# वारकरी चळवळीचे महानायक

( राष्ट्रसंत संत शिरोमणी संत सेना महाराज पुण्यतिथी विशेष लेख)

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. या राज्यात अनेक संत होऊन गेले. संताची ही गौरवशाली परंपरा संत ज्ञानेश्वरांपासुन जगद्गुरु तुकारामापर्यंत सांगता येईल. नाभिक समाजात असेच एक संत होऊन गेले ते म्हणजे संत सेना महाराज



बाराव्या शतकात मध्यप्रदेशात विषमतेविरुध्द बंड पुकारणारे नाभिक समाजाचे राष्ट्रसंत संत शिरोमणी संत सेनाजी महाराज यांचा जन्म मध्यप्रदेश राज्यातील उमरीया जिल्ह्यातील बांधवगड या गावी वैशाख वद्य व्दादशीला रविवार 1190 या दिवशी झाला.

त्यांच्या वडिलांचे नाव देविदास वैद्य तर आईचे नाव प्रेमकुवरबाई देविदास वैद्य असे होते. त्यांचे वडील हे तत्कालिन मंत्रीमंडळातील एक चाणाक्ष कर्तुत्ववान व प्रभावशाली मंत्री होते.

सेना महाराजांचे कार्य :-

सेना महाराजांनी समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा,कर्मकांड, दैववाद,विरोधात दंड थोपटून बंड पुकारण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. निद्रिस्त समाजाला गदागदा हलवून खडबडून जागे केले.जातीविहरीत व शोषणमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी त्यांनी भारतभ्रमण करुन समाजाचे प्रबोधन करण्याचे कार्य केले.

महाराष्ट्रात त्यांनी अनेक काळ वास्तव्य केले. अल्पावधीतचं त्यांनी मराठी भाषा आत्मसात करुन इतके प्रभुत्व मिळवले की, मराठी भाषेत त्यांनी अनेक उत्कृष्ट अभंगांची निर्मिती केली.

उदाहरणार्थ,

आम्ही वारीक वारीक । करु
हजामत बारीक ।।
विवेक,दर्पण आयना दावू ।
वैराग्य चिमटा हालवू ।।
उदक शांता डोई घोळू ।
अहंकाराची शेंडी पिळू ।।
भावार्थाच्या बगला झाडू ।
कामक्रोध नखे काढू ।।

अशा प्रकारचे अनेक मराठी अभंग महाराजांनी रचले व त्याव्दारे समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांनी स्वतःला वारकरी चळवळीत झोकून देऊन चार वर्णाच्या गराड्यात अडकलेला हा समाज व त्यांतील जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी त्यांनी अविरत संघर्ष केला.



जाती कुळाने भक्ती श्रेष्ठत्व ठरत नसुन त्यांच्या शुध्द भावावर व कर्मावर ठरते आणि परमेश्वर हा व्यक्तीच्या चांगल्या आचारणात व सत्कर्मात असतो हेच मर्म त्यांनी सांगितले.जातीभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाह व सहभोजन यासारखे उपाय सांगितले.

सेनाजी महाराज हे नुसते शब्दवीरच नव्हते तर कृतीवीर होते. माणसाला माणुस म्हणून जगता यावे यासाठी त्यांचा महत्वपूर्ण प्रयत्न होता. यासाठी त्यांनी अठरा राज्यात फिरुन वारकरी चळवळ भक्कम करुन अन्याय,अत्याचार, अंधश्रध्दा यावर प्रहार करुन वारकरी ही संकल्पना दृढ केली.

ज्यावेळी त्यांच्या राजाला कोड हा आजार झाला होता, त्यावेळी चमत्काराने,नवस सायासाने तो कोड बरा होणार नही तर आयुर्वेदाच्या शास्त्राने, विज्ञानाच्या आधारावर, निसर्गाच्या अभ्यासाने नाहीशे करण्याचा प्रयत्न त्यांनी केला म्हणूनच ते जगातील कुष्ठरोग्यांवरील औषधाचे जनक ठरले.

अशा परिवर्तनवादी, विज्ञानवादी, समाजसुधारकाच्या राष्ट्रसंताच्या विचारांना नष्ट करण्याचा प्रयत्न इथल्या प्रस्थापित व्यवस्थेने केला.

सेनाजी महाराजांचे संदेश :

चोरी करु नका, खोटे बोलू नका,व्याभिचार करु नका, मद्यापान करु नका, स्त्री जातीचा सन्मान करा, आई-वडिलांची सेवा करा, कठोर परिश्रम करा. असा आखिल मानवजातीसाठी लोककल्याणकारी असणाऱ्या संदेश त्यांनी माणसाला दिला.

प्रामुख्याने नाभिक समाजाचा अलौपिक व राष्ट्रनिर्माणासाठी पोषख असलेला इतिहास पाहता तथागत बुध्दांच्या सहवासातील भन्ते उपाली पासुन, वारकरी चळवळीचे महानायक संत सेनाजी महाराज, स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराजांवर सय्यद बंडाचा होणारा वार आपल्या अंगावर घेणारे नाभिक समाजभुषण जिवाजी महाले, पन्हाळगडावरुन शिवाजी महाराजांची सुटका होण्यासाठी हूबेहूब महाराजांचे प्रतिरुप धारण करणारे व आपल्या प्राणाची बाजी लावणारे वीर शिवाजी काशिद, स्वातंत्र्यसैनिक विरभाई कोतवार, सांडू सखाराम वाघ, शाहीर लाला वाघमारे, इथपर्यंतचा इतिहास हा मानवी समाजाला उर्जा देणारा असा आहे.

ज्या व्यवस्थेने या समाजाला हीन समजले तोच नाभिक समाज राष्ट्र निर्माणास पोषक असणारी कारकीर्द उभी करुन शकतो ! ही एक चिकित्सक विचार करण्यास भाग पडणारी गोष्ट आहे.

माणसातील माणुसकी नष्ट झालेल्या माणसाला माणुस जोडण्याचे काम सेनाजींनी केले. आपल्या जीवन कार्यात त्यांनी तथागत बुध्दांना, भारतीय स्वातंत्र्याला, सांविधानाला,समतामुलक समाज निर्मितीस अपेक्षित असलेले कार्य त्यांनी केले.

श्रावण कृष्ण व्दादशीला संत सेना महाराज समाधीस्त झाले.

आत्ता या महान संताची विवेकी विचारधारा जर समजुन घेतली तर संताच्या विचारधारेवर आधारित राष्ट्रव्यापी व एक विश्वव्यापी वारकरी चळवळ उभी राहील.

**लेखक - प्रा.खंडागळे सोमीनाथ
पाटोदा (बीड)
( मा.जिल्हाकार्याध्यक्ष- महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड/संचालक- ओम कोचिंग क्लासेस पाटोदा)
मो.9657284444**

# टायगर ग्रुप आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

## टायगर ग्रुप चे तालुका अध्यक्ष अजित गालफाडे यांचं विद्यमान आमदार प्रकाश दादांनी केले कौतुक

## तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी , शैक्षणिक पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव,

बीड प्रतिनिधी अंकुश गवळी
वडवणी तालुक्यातील टायगर ग्रुप महाराष्ट्र राज्य व केंडेपिंपरी धानोरा पुनंद गाव ग्रामपंचायत आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या दोन दिवसीय जयंती उत्सव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी या कार्यक्रमाला उपस्थित माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके, यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला यावेळी वडवणी तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी शैक्षणिक पत्रकरिता वृक्षमित्र विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव संपन्न झाला यावेळी शैक्षणिक कार्यामध्ये वडवणी तालुक्यामध्ये खांडवे कोचिंग क्लासेस चे संचालक सौरभ खांडवे यांचा गुणगौरव झाला, वृक्ष मित्र म्हणून तिगावचे सरपंच राज पाटील यांचा गौरव झाला, वडवणी तालुक्यातील पत्रकारांमध्ये ग्रामीण भागातील तालुक्यातील सर्वसामान्यांच्या बातम्या ला न्याय देणारे व्यक्तिमत्व म्हणून युवा पत्रकार अंकुश गवळी यांचा सुद्धा पत्रकरिता क्षेत्रामध्ये सन्मान झाला, डॉक्टर गिलबिले सर यांचा वैद्यकीय क्षेत्रामध्ये सन्मान झाला, यावेळी या कार्यक्रमाला उपस्थित माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान



आमदार प्रकाश दादा सोळंके, वडवणी नगरीचे नगराध्यक्ष शेषेराव बापू जगताप, युवा नेते आनंद भैया काळे, जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती कल्याण भाऊ आबुज, माजी सरपंच लखन महागोविंद, ज्येष्ठ पत्रकार अशोक निपटे, परडी माटेगाव चे विद्यमान सरपंच माधव शेंडगे, तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, साप्ताहिक गदर चे मुख्य संपादक ज्ञानेश्वर लंगे सर, आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी प्रकाश दादा सोळुंके मंचावर उपस्थित बोलताना म्हणाले आहेत की टायगर ग्रुप हा सामाजिक बांधिलकी जोपासणारा ग्रुप आहे, अजित गालफडे यांनी आगळीवेगळी जयंती साजरी केली त्याच्याबद्दल त्यांचे कौतुक विद्यमान आमदार दादांनी केलं, या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील ग्रामस्थ तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते

# हसनाळ येथील मृतांच्या वारसदारांना प्रत्येकी 4 लाख रुपयाची मदत

## नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे जिल्हा प्रशासनाला निर्देश

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : राज्यात मागील 4 दिवसांपासून सतत पाऊस सुरू आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील लेंडी धरणाच्या प्रभावक्षेत्रात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने रावणगाव, हसनाळ, भिंगोली, भासवाडी या गावामध्ये पाणी शिरले. या गावांमध्ये मोठ्याप्रमाणात जनावरांचे नुकसान होऊन 5 नागरिकांचा मृत्यू झाला आहे. अनेक हेक्टर क्षेत्रावरील शेतीचे नुकसानही झाले आहे. या नुकसानीचा अंदाज घेऊन नुकसानग्रस्त गावातील नागरिकांना शासनाच्यावतीने सर्वतोपरी मदत करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. यावेळी मृत्तांच्या वारसदारांना प्रत्येकी 4 लाख रुपयांची मदत धनादेश स्वरुपात मंत्री गिरीश महाजन





यांच्या हस्ते वितरीत करण्यात आली. आज नांदेड जिल्ह्यात नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी मंत्री गिरीश महाजन हे दौऱ्यावर आले. त्यांनी मुखेड तालुक्यातील हसनाळ या गावातील पूरग्रस्त भागाची पाहणी करुन येथील नागरिकांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणुन घेतल्या. तसेच मारजवाडी या पुर्नवसीत गावालाही त्यांनी भेट देऊन तेथील गावकऱ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी आमदार डॉ. तुषार राठोड, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, देगलूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, परिसरातील शेतकरी, नागरिक आदींची उपस्थिती होती. यावेळी आमदार डॉ. तुषार राठोड यांनी या भागात पूरपरिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती मंत्री गिरीश महाजन यांना दिली. यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी तात्काळ पंचनामे करण्याचे जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले. त्यांनी स्थानिक नागरिकांच्या समस्याही जाणून घेतल्या. त्यांच्या या समस्यांबाबत लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन त्या सोडविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. तसेच या भागातील नुकसानग्रस्तांचा रोष जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांवर असल्याचे कळल्यानंतर याबाबत लवकरच चौकशी करुन दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईल, असे मंत्री गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले. मृतांच्या वारसदारांना मदत नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यू झालेल्या नागरिकांच्या वारसदारांना यावेळी प्रत्येकी 4 लाख रुपयाची मदत धनादेश स्वरुपात आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते देण्यात आला. मृत्यू झालेल्या व्यक्ती व त्यांचे वारसदार याप्रमाणे आहेत. मृत्य व्यक्ती पिराजी म्हैसाजी थोटवे (वय 70) त्यांचे वारस मारोती पिराजी थोटवे मुलगा. चंद्रकला विठ्ठल शिंदे (वय 35) त्यांचे वारस विठ्ठल व्यंकटराव शिंदे पती. ललिताबाई गोविंद भोसले (वय 60) त्यांचे वारस मुलगा जगदीश गोविंद भोसले व मधुकर गोविंद भोसले. भीमाबाई हिरामण मादाळे (वय 65) त्यांचे वारस संग्राम हिरामण मादाळे, राहुल हिरामण मादाळे मुले. गंगाबाई गंगाराम मादाळे (वय 65) त्यांचे वारस मुलगी लालाबाई व्यंकट मादाळे यांना मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २० ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## "इडा पिडा घेऊन जा गे मारबत : नागपूरची अनोखी परंपरा"

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. प्रत्येक प्रांत, शहर, गाव आपापल्या संस्कृतीनुसार सण उत्सव साजरे करतो. महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराची अशीच एक वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण परंपरा म्हणजे मारबत उत्सव. हा उत्सव फक्त सणापुरता मर्यादित नसून तो एक प्रकारचा सामाजिक आरसा आहे, ज्यातून समाजातील विकृतींवर प्रहार केला जातो. या उत्सवाची एक वेगळीच गंमत आहे. फटाक्यांचा आवाज, ढोल ताशांचा गजर, झांज मृदुंगांच्या लयीत थिरकणारे नागपूरकर, रस्त्यांवर सजलेले पुतळे, आणि विशेष आकर्षण म्हणजे मारबत आणि बडग्या . पण हा उत्सव एवढाच नाही, त्यामध्ये आहे एक सशक्त इतिहास, एक धगधगता निषेध आणि जिवंत सामाजिक संदेश. मारबत उत्सवाची सुरुवात १८८० च्या दशकात नागपूरमध्ये झाली असे म्हटले जाते. पण त्यामागील खरी कथा आहे श्रीमंत बाकाबाई भोसले हीची. ती भोसले घराण्यातील एक प्रमुख स्त्री होती, जी इंग्रजांच्या बाजूने गेली होती. स्वातंत्र्यलढ्यात इंग्रजांविरुद्ध नागपूरकरांमध्ये संताप उसळला होता, त्या संतापाचे प्रतीक म्हणून काळी मारबत उभारण्यात आली. बाकाबाईच्या विश्वासघाताचा निषेध करण्यासाठी या काळ्या मारबतीला शहरभर फिरवून अखेरीस जाळले गेले. तो दिवस नागपूरच्या इतिहासात एक टप्पा ठरला. कारण एका स्त्रीच्या निषेधातून समाजाने इंग्रजाविरुद्धची आपली नाराजी व्यक्त केली. यानंतर प्रत्येक वर्षी काळी मारबत काढली जाऊ लागली, जी आजही नागपूरच्या ओळखीचा भाग आहे. इतकच नाही तर इंग्रज सत्तेच्या विरोधात पिवळी मारबत ही काढली गेली. ती थेट ब्रिटिशांच्या शोषण, करव्यवस्था आणि अन्यायाचा निषेध करणारी होती. अशाप्रकारे काळी आणि पिवळी मारबत या नागपूरच्या राजकीय आणि सामाजिक जाणीवांच्या प्रतीक बनल्या. बैलपोळ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच तान्हा पोळा दिवशी नागपुरात हा उत्सव साजरा केला जातो. मारबत जाळताना नागपूरकर एक घोष करतात,

"इडा पिडा खासी खोकला, रोगराई सारी घेऊन जा गे मारबत" या वाक्यात नागपूरकरांची भावना दडलेली आहे. जणू साऱ्या आजारपण, संकट, रोगराई, भ्रष्टाचार, अन्याय या सगळ्यांना त्या मारबती सोबत जाळून टाकायचं आणि एक नवीन सुरुवात स्वच्छ, निरोगी आणि उत्साही करायची. हे वाक्य फक्त एक उद्गार नाही तर सामाजिक नकारात्मक शक्तीविरुद्धचा एक जनआक्रोश आहे. मारबत उत्सवाची वैशिष्ट्य म्हणजे तो फक्त नागपूर मध्येच मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. इतरत्र भारतात या प्रकारची परंपरा नाही. नागपूर हे नेहमीच सामाजिक चळवळीचे केंद्र राहिले आहे. विदर्भातील जनतेतून अन्यायविरुद्ध आवाज उठवण्याची परंपरा आहे. नाटकं, कीर्तन, लोककला या सगळ्यातून सामाजिक संदेश देण्याची जी परंपरा आहे त्यातच एक जिवंत भाग म्हणजे मारबत उत्सव. "मारबत" हा शब्द स्थानिक बोली भाषेतून आलेला मानला जातो. 'मार' म्हणजे नाश करणे आणि 'अबत' म्हणजे संकट किंवा विकृती. म्हणजेच संकटांचा नाश किंवा वाईट प्रवृत्तींचा नाश हा मारबतचा प्रत्यक्षार्थ होतो. प्रारंभी इंग्रजांचा व स्थानिक विश्वासघातकांचा निषेध करणारा हा उत्सव आता सामाजिक विकृतींवर प्रहार करण्यासाठी वापरला जातो. आजच्या काळात बेरोजगारी, महागाई, नशेचे व्यसन, भ्रष्टाचार, स्त्रियांवरील अत्याचार, पर्यावरणाचा नाश, वाहतूक कोंडी अशा अनेक समस्या मारबत म्हणून उभ्या केल्या जातात. रस्त्यांवर नाचणाऱ्या, घोष करणाऱ्या हजारो नागपूरकरांच्या तोंडून समाजातील ज्वलंत प्रश्न बाहेर पडतात. तो एक लोकशाहीचा आरसा आहे, जिथे प्रत्येकाला आपलं मत आपली नाराजी व्यक्त करण्याची संधी मिळते. हा उत्सव केवळ परंपरेपुरता मर्यादित नाही. तो एक जाणीवेचा उत्सव आहे. समाजातील प्रत्येक माणूस, लहानांपासून मोठ्यांपर्यंत, या उत्सवात सामील होतो. प्रत्येकाच्या मनात एकच भाव "वाईट प्रवृत्तींचा नाश व्हावा, आपलं आयुष्य सुखी व्हावं." आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियातून अनेक आंदोलनं उभी राहतात. पण शंभर वर्षांपूर्वी लोकांनी आपली नाराजी व्यक्त करण्यासाठी "मारबत" सारख्या लोककलेचा उपयोग केला. आजही ही परंपरा चालू राहणे म्हणजे नागपूरकरांचे सामाजिक भान आणि एकतेचे द्योतक आहे. आजच्या तरुण पिढीला या उत्सवाचा खरा अर्थ समजावून घेणं आवश्यक आहे. फक्त पुतळा जाळून समस्या सुटत नाहीत. पण त्या समस्यांविरुद्ध लढण्याची प्रेरणा मात्र या उत्सवातून मिळते. मारबत उत्सव हा नागपूरकरांचा आत्मा आहे. इंग्रजांविरुद्धचा संताप, बाकाबाई भोसलेचा निषेध, पिवळी मारबत, काळी मारबत या साऱ्याच गोष्टींचं प्रतीक म्हणजे हा सोहळा. "इडा पिडा खासी खोकला रोगराई घेऊन जा गे माराबत" हा घोष फक्त एक वाक्य नाही तर नागपूरकरांच्या मनातील भावना आहे. जणू साऱ्याच दुःखांना, आजारांना, भ्रष्टाचाराला या ज्वालेत अर्पण करायचं आणि नव्या उत्साहाने जीवन सुरू करायचं. आजही जेव्हा ढोल-ताशांच्या गजरात मारबत जाळली जाते, तेव्हा असं वाटतं की नागपूर शहराने पुन्हा एकदा आपल्या ताकदीने, आपल्या परंपरेने आणि आपल्या सामाजिक जाणीवेने जगाला संदेश दिला आहे. मारबत हा केवळ उत्सव नाही, तो आहे नागपूरचा वारसा, नागपूरची ओळख आणि नागपूरच्या आत्म्याचा हुंकार.

मारबत जळे, जळती विकृती,
**नागपूरचा हुंकार, जनतेची शक्ति।**
**काळी-पिवळी कथा सांगती,**
**वाईट प्रवृत्तीची राख होऊनी जाति।**
**"इडा पिडा खासी खोकला" हा घोष,**
**आगीत विलीन सारे दुःखांचा ओघ।**
**उत्सव नव्हे हा फक्त परंपरा,**
**हा नागपूरचा सामाजिक जयघोष खरा।**

**वंश कांता संजय काळे, नागपूर**
**(नवोदित कवी, लेखक)**

# भर पावसातही शुभंकरोति साहित्य परिवारचा एक दिवसीय कार्यक्रम थाटामाटात संपन्न

साहित्य यज्ञ हेच आमचे ध्येय असलेल्या शुभंकरोति साहित्य परिवारतर्फे रविवार दि.१७ ऑगस्ट २०२५ रोजी दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र मुंबई येथे राज्यस्तरीय गझल कार्यशाळा, शुभंकरोति गुणगौरव पुरस्कार, पुस्तक प्रकाशन आणि गझल मुशायरा आयोजित करण्यात आले होते. संमेलनाध्यक्षपद मा. हेमंत सुधाकर सामंत यांनी भूषवले होते तर मा. नीलकंठ श्रीखंडे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख पाहुणे महायोजक मा. श्री. राजीव श्रीखंडे, प्रमुख मान्यवर मा. श्री. गुलराज सिंग (ढगे), गझल मुशायऱ्याचे अध्यक्ष मा. आप्पा ठाकूर तसेच संस्थेच्या संस्थापिका मा. सौ. सोनाली जगताप, प्रशासक मा. जयंत शिगवण, मा. किरण वेताळ, मा. अंकिता गायकवाड इत्यादी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने आणि त्यानंतर मा. सौ. सोनाली जगताप यांच्या ईशस्तवनाने झाली. त्यानंतर संमेलन अध्यक्ष श्री. हेमंत सुधाकर सामंत यांची सौ. सोनाली जगताप व श्री. सुहास जगताप यांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर मा. स्वाती पोळ यांनी मान्यवरांचा



परिचय करून दिला. सर्व मान्यवरांनाही शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.त्यानंतरच्या गझल मुशायरा या सत्रात मा. किरण वेताळ यांनी मा. श्री ए. के. शेख सरांनी जुलै महिन्यात घेतलेल्या गझल कार्यशाळेचा आढावा घेतला.या कार्यशाळेत सहभाग घेतलेले मा. शिल्पा चऱ्हाटे, मा. सोनाली जगताप, मा. गौरी पंडित, मा. दिपाली घाडगे, मा. अंकिता गायकवाड यांनी आपली स्वलिखित गझल सादर केली. मा. राधिका भांडारकर यांनी मा. अरुणा मुल्हेरकर यांची गझल सादर केली तर मा. सुनील पारेख यांनी गुजराती गझल सादर केली.या क्षेत्राचे सूत्रसंचालन मा. दिपाली घाडगे यांनी केले. त्याचवेळी सुप्रसिद्ध कवयित्री मा. रेश्मा कारखानीस यांचे अवचित आगमन झाले. त्यांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले व एक सुंदर गझल सादर केली. मा. जीतू आर म्हात्रे यांनी पण एक सुंदर गझल सादर केलीत्यानंतर मा. सुहास जगताप व मान्यवर सुप्रसिद्ध संगीतकार गुलराज सिंग (ढगे) आणि गझल गायक आदित्य कडतने या तिन युवकांनी आपल्या सुमधुर आवाजात गझला गाऊन प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.पुढील सत्रात मा. शिल्पा चऱ्हाटे यांचे "भेट तुझी माझी" आणि ऋचा पारेख यांचे "आत्मायन" या दोन पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.त्यानंतरच्या सत्रात मा. हेमांगी नारकर, मा. प्रकाश राणे, मा. विसुभाऊ बापट, मा. निखिल कोलते, मा. वैभव धनावडे, मा. प्रमोद सूर्यवंशी, मा. सुनील पारेख, मा. आदित्य कडतने, मा. जयंत शिगवण, मा. डॉक्टर अलका नाईक, मा. विजय जोशी (विजो), मा. किरण वेताळ, मा. सुरेश पवार, मा. मनोज वराडे, मा. राजीव श्रीखंडे, मा. अस्मिता चौधरी, मा. सदानंद डबीर, मा. रुपेश मुरुडकर, मा. जितू म्हात्रे, मा. पल्लवी सरमरकर, मा. भक्ती भोसले यांना मान्यवरांच्या हस्ते शुभंकरोति गुणगौरव पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले.या सत्राचे अतिशय उत्कृष्ट असे सूत्रसंचालन मा. जितू म्हात्रे, मा. शिल्पा चऱ्हाटे, मा. स्वाती पोळ आणि मा. दिपाली घाडगे यांनी केले.कोकण विभाग पत्रकार संघातर्फे मा. सौ. सोनाली जगताप यांना मा. पत्रकार रवींद्र यशवंतराव (देशमुख) यांच्या हस्ते तसेच मा. मनोज वराडे, डॉक्टर सुभाष कटकदौंड, मा. डॉक्टर अलका नाईक यांच्या हस्ते साहित्य सरिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.त्यानंतर मा. हेमंत सुधाकर सामंत सरांचे अध्यक्षीय भाषण अतिशय प्रबोधन देणारे होते.पुढील सत्रात मा. गझलकार आप्पा ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली गझल मुशायरा रंगला. यात मा. कल्पना गवरे, मा. नंदू सावंत, मा. रवींद्र यशवंतराव (देशमुख), मा. मनोज वराडे, मा. प्रतिभा सराफ, मा. सौ. स्मिता हर्डीकर, मा. राधिका भांडारकर, मा. डॉक्टर सुभाष कटकदौंड, मा. कमलाकर राऊत, मा. निशा वर्तक, मा. मानसी म्हसकर, मा. किरण वेताळ या निमंत्रित गझलकारांनी आपल्या बहारदार गजला सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली. याचे सूत्रसंचालन मा. किरण वेताळ यांनी केले. मा. आप्पा ठाकूर यांची प्रत्येक गझल मनाला भुरळ घालत होती. त्यांची सुप्रसिद्ध गझल करार बाकी आहे आणि विठ्ठलाची गझल ऐकून प्रेक्षक भारावून गेले.

# जिरेमाळी समाज सेवा संघ महाराष्ट्र राज्य अंतर्गत धुळे जिल्हा गुणगौरव सोहळा,नेर ता.जि.धुळे येथे यशस्वी संपन्न

नाशिक प्रतिनिधी : जिरेमाळी समाजसेवा संघ महाराष्ट्र राज्य अंतर्गत धुळे जिल्हा आयोजित सन २०२४ - २५ गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा तसेच विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण कामगिरी बजावणारे समाज बांधवांचा गुणगौरव सोहळा व सत्कार समारंभ दिनांक १७/०८/२०२५ रविवार रोजी मौजे नेर. ता.जि.धुळे.येथील समाज बांधव श्री भास्कर सोनवणे यांच्या बालाजी लॉन्स लोणखेडी फाटा नेर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष-मा.दामोदर मनोहर पगारे तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.नारायण डी.नवले(संस्थापक, जिरेमाळी स.सेवासंघ महाराष्ट्र राज्य),सौ स्वातीताई कोल्हे,हेमलताताई मानकर,कविताताई क्षीरसागर,जेष्ठ समाजसेवक मा.आर. बी.जिरे,मा.एम.एच पाटील,मा.धिरज काशिनाथ पाटील (शिवसेना उबाठा महानगरप्रमुख,धुळे), मुंबईहून मा.किरण पगारे,मा.प्रकाश जाधव,मा.संजय जी.ढोले,पिशोर येथून राजू डहाके,आर के मोकासे,उंडनगावचे अजित पाटील,सौ रीना पाटील,सौ सीमाताई पाटील,प्रा.डी टी पाटील सर,पंडित साळवे सर,काशिनाथ बापूजी नंदन,मधुअण्णा साळवे कमलाकर बापू,डी एल पाटील,नाना पाटील,पिंपळनेरचे श्री व्ही एन आप्पा, सेवानिवृत्त ए पी आय श्री पंडीतराव केवळ सोनवणे,श्री पी एस दादा,दाभाडीचे सुभाष नहीरे,ज्ञानेश्वर खैरनार,मोहन महाजन,संभाजीनगर जिल्हाध्यक्ष श्री अनिल माळी,शेनपूरचे श्री प्रभाकर पगारे, पिंपळनेरचे संजय साळवे,निंबा जाधव,घोडदे येथील श्री के डी पाटील,भिला नंदन गुरुजी,कुसुंबा येथील श्री अनिल पवार या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



त्यानंतर कार्यक्रमांची प्रस्तावना जिल्हाध्यक्ष श्री आर जे पाटील सर यांनी केले.आलेल्या प्रमुख मान्यवरांचे शाँल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.समाजातील शिष्यवृत्ती,एन.एम.एस, नवोदय,१० वी,१२ वी,पदवी व पदवीउत्तर परिक्षेत घवघवीत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा,तसेच सेवानिवृत्त,प्रमोशन झालेल्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा संस्थेच्या वतीने कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र व ट्राफी तसेच राष्ट्रपिता क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचे शेतकऱ्यांचा आसूड हे पुस्तक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.पिंपळनेर येथील समाजबांधव संभाजीनगर येथील प्राथमिक शिक्षक श्री प्रदीपजी गुरुजी यांच्या बालकवी पुस्तकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. नेर येथील सेवानिवृत्त विस्ताराधिकारी श्री भास्कर सोनवणे,श्री दिलीप सीताराम सोनवणे,श्री शरद सीताराम सोनवणे, श्री बाळु आण्णा सोनवणे यांच्यासह,दिनेश नामदेव सोनवणे,किरण काशिनाथ पुराणिक,दीपक बाळू सोनवणे,संजय विष्णू अहिरे,तुषार सुरेश सोनवणे,राहुल यशवंत सोनवणे,नितेश सुरेश सोनवणे,अनिल विलास जिरे,शिव नंदू सोनवणे,मुकुंद सोनवणे,रोशन अमृत सोनवणे,उदय बिपिन सोनवणे,सुभाष भटू साखरे यांच्यासह नेर येथील सर्व समाज बांधवांनी अतिशय सुंदर असे सुरुची भोजनाचे नियोजन करुन कार्यक्रम यशस्वी केला तसेच श्री.पुंडलिक भटू सोनवणे यांनी चहा आणि नाश्त्याची व्यवस्था केली.सदर कार्यक्रमा प्रसंगी सौ स्वातीताई कोल्हे,राजू डहाके सर,कविताताई क्षीरसागर,शिवसेना उबाठा गटाचे धुळे महानगर प्रमुख बुलंद तोफ धीरजभाऊ पाटील यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन त्यांचे मनोबल वाढविले.जिरेमाळी समाजसेवा संस्थेचे संस्थापक श्री नारायणजी नवले साहेबांनी विद्यार्थ्यांना मेडिकल व इंजिनिअरिंग सोबतच अन्य अभ्यासक्रमाकडे वळण्याचे आवाहन केले.वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यानी नव्यानेच सुरू होत असलेल्या ॲक्युपंक्चर डिप्लोमा कोर्स ला प्रवेश घ्यावा असे सांगितले.तसेच विवाह वेळेवर लावावेत जास्तीत जास्त पंधरा मिनिटे वाट पाहावी व आपण तेथून निघून जावे असा ठराव संमत केला.सदर कार्यक्रमात धुळे जिल्हा महीला अध्यक्ष म्हणून सौ कविताताई क्षिरसागर,उपजिल्हाध्यक्ष पदी सौ वैशाली दिनेश पाटील(बल्लक) तसेच युवा जिल्हाध्यक्ष श्री अमोल अरुण क्षीरसागर यांना नियुक्तीपत्र दिले व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा ही दिल्या. श्री अमोल अरुण क्षीरसागर यांनी सर्वांचे आभार मानून नेर वसियांच्या विनंतीला मान देऊन सर्व प्रमुख अतिथी उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले.कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन धुळे जिल्हाध्यक्ष श्री आर.जे.पाटील सर,अमोल क्षीरसागर,भास्कर सोनवणे,तसेच डी.पी.पाटील सर यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी "शेतकऱ्यांचा आसूड" हे पुस्तक श्री प्रभाकर पगारे व प्रा.डी टी पाटील सर यांनी दिले तसेच विद्यार्थ्यांना ट्रॉफी धुळे जिल्हाध्यक्ष श्री आर जे पाटील सर,घोडदे येथिल श्री कैलास पाटील सताळे (गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर)यांनी स्वखर्चातून दिले... सदर कार्यक्रमासाठी पिंपळनेर देशीरवाडे,घोडदे, कावठे,नेर,कुसुंबा कोकले,वार,आनंद खेडे, न्याहोळोद,धुळे तेथील समाजबांधव तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देशाच्या 79 व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त डोंबिवलीमध्ये भव्य आरोग्य शिबीर संपन्न संपन्न

डोंबिवली(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) इनरव्हील क्लब ऑफ डोंबिवली पश्चिम, लाल बावटा रिक्षा युनियन डोंबिवली आणि सिटीझन वेलफेयर असोसिएशन बदलापूर यांच्या माध्यमातून आयोजीत शिबिरात शंभर पेक्षा जास्त नागरिकांनी घेतला लाभ

देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने डोंबिवली येथील इनरव्हील क्लब ऑफ डोंबिवली आणि सिटीझन वेलफेयर असोशिएशन बदलापूर आणि लाल बावटा रिक्षा युनियन डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराला डोंबिवलीकर




नागरीकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. शंभर पेक्षा जास्त नागरिकांनी या शिबिरात सहभाग घेऊन आरोग्य तपासणी शिबीराचा लाभ घेतला. एलपीझो सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल एन्ड मेडिकल रिसर्च सेंटर डोंबिवली आणि ट्रायम्फ ब्लड सेंटर ठाणे यांनी या शिबीरासाठी आपली सेवा प्रदान केली. इसीजी, रक्तदाब, डोळे आणि रक्त शर्करा तपासणी करण्यात आली.

क्लबच्या अध्यक्षा लक्ष्मी चयनी, मा. सचिव बबिता अत्रे, प्रकल्प प्रमुख गीता कुलकर्णी (ब्लड डोनेशन) आणि आरोग्य शिबीराच्या प्रकल्प प्रमुख अमृता केतकर यांनी या शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. अध्यक्ष कॉम्रेड काळू कोमस्कर, कार्याध्यक्ष कॉम्रेड राजू परांजपे, सचिव कॉम्रेड प्रवीण पाटील, उपाध्यक्ष कॉम्रेड अरुण वेळास्कर या सर्वांच्या प्रयत्नातून हा स्वातंत्रोत्सव संस्मरणीय झाला. सिटीझन वेलफेयर असोशिएशन बदलापूरचे सचिव श्री राजेंद्र नरसाळे आणि सोशल हेल्थ एक्टिव्हिटिस्ट डॉ. अमितकुमार गोईलकर यांचे या शिबिरासाठी विशेष योगदान लाभले. उपस्थित सर्व डॉक्टर्स आणि ब्लड बँक टेक्निशियन डॉक्टर्स यांचे आभार मानून दुपारी शिबिराची यशस्वी सांगता झाली.

दैनिक लोकआरंभ लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २० ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com


# राज्यात पावसामुळे शेतीच मोठं नुकसान, मुख्यमंत्र्यांनी तात्काळ मदतीसंदर्भात निर्देश दिले

राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झालेली आहे. 12 ते 14 लाख एकर जमीन त्यावरची पीक बाधित झालेली आहेत. काही प्रमाणात जनावरांचं नुकसान झालेलं आहे. विशेषत: नांदेड जिल्ह्यात ढगफुटी सदृश्य परिस्थिती आली. आठ लोकांचा मृत्यू झालेला आहे. वाईट घटना आहे. ओव्हरऑल परिस्थिती आता नियंत्रणात आहे” असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ‘‘मुंबईत अतिवृष्टी झाली. काही भागात 300 एमएमपेक्षा जास्त पाऊस झाला. रेकॉर्ड पाऊस पडला. काही ठिकाणी पाणी साचलं, आता पाणी ओसरुन वाहतूक चालू झालीय. मुंबई उपनगरीय लोकलची प्रवासी वाहतूक मंदगतीने बहुतांश ठिकाणी सुरु आहे” असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. “मिठी नदी धोका पातळीवर गेल्यामुळे 400 ते 500 लोकांना सुरक्षित स्थळी हलवावं लागलं. पण आता पाण्याची पातळी कमी होत आहे. पुढच्या काही काळासाठी पावसाचे अंदाज वर्तवण्यात आले आहेत. त्यामुळे परिस्थितीवर लक्ष ठेऊन आहोत. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वत: रस्त्यावर उतरले आहेत. ते स्वत: मिठी नदीच्या ठिकाणी गेले. स्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न





सुरु आहेत. सुट्टी देखील दिली आहे, जेणेकरुन लोकांवर जाण्याचा ताण पडू नये. शक्य आहे तिथे वर्कफ्रॉम होम देण्याचे निर्देश दिले आहेत. याक्षणी परिस्थिती नियंत्रणात आहे. आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेऊन आहोत” असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. तिथे धोका आहे, तिथे लक्ष ठेऊन आहोत’
“एनडीआरएफ, एसडीआरएफ अलर्टवर आहेत. बहुतांश नद्या इशारा पातळीवर आहेत. बाजूच्या राज्यांसोबत नीट संपर्क आहे. त्यामुळे जो काही पाण्याचा विसर्ग आहे, त्याचं मॅनजेमेंट करतोय. बाजूची राज्य मदत करतायत. तेलंगण सोबत ही योग्य प्रकारे संपर्क आहे. काही कॅचमेट असे आहेत, जे कंट्रोलमध्ये नाहीयत, अनकंट्रोल आहेत तिथे धोका आहे. तिथे लक्ष ठेऊन आहोत” असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं. मिठी नदीच्या धोका पातळीबद्दल काय म्हणाले?
मुंबईत मिठी नदीच्या प्रश्नावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, “मुंबईत दोन गोष्टी आहेत, 300 मिमी मोठा पाऊस मानला जातो. नियमित पावसापेक्षा जास्त पाऊस मानला जातो. मागच्या काळात मिठी नदीच काय झालं माहित आहे, त्याच्या सूरस, चमत्कारिक कथा समोर येत आहेत” “मिठी नदीतून गाळ काढण्याच्या नावाखाली जे काही केलं, ते समोर आलय. नव्याने काम करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्य सरकारने महापालिकेला निर्देश दिले आहेत.

# महाअनिस नवी मुंबई जिल्हा आयोजित कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर उत्साहात संपन्न

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नवी मुंबई जिल्हा वतीने दिनांक १७ आगस्ट २०२५ रोजी डॉ.नरेंद्र दाभोलकर विज्ञान केंद्र खारघर येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. कोणत्याही संघटनेत प्रशिक्षण ही निरंतर चालणारी आवश्यक प्रक्रिया असते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मध्ये नवीन कार्यकर्ते घडण्यासाठी,समितीची मूलभूत माहिती होण्यासाठी सतत कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीरे संवादी स्वरूपात होत असतात.नवी मुंबई जिल्हा




वतीने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.यात महाअनिस पंचसूत्री मा.अशोक निकम, महाअनिस भूमिका व व्यापकता मा.प्रदीप कासुर्डे, वैज्ञानिक दृष्टीकोन मा. राजेंद्र पंडित यांनी विविध उदाहरणे देऊन छानपैकी तीनही विषयांचे सादरीकरण केले. यात कार्यकर्त्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नाचे उत्तरे देखील देण्यात आली.यानंतर नितीन खेडकर यांनी विविध चमत्कार प्रयोगाचे सादरीकरण करून त्यामागील हातचलाखी, विज्ञान समजावून दिले.तसेच मा. अरविंद सोनटक्के यांनीही कार्यकर्त्यांनी मार्गदर्शन केले.आम्ही या शिबिरातून ज्या अपेक्षा व्यक्त केल्या होत्या त्या पेक्षा अधिक प्रमाणात समाधानी आहोत अशा अपेक्षा विविध कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.शिबिरात श्रावणी हाटे, आदिती सपकाळ, शैलेश भंडारे, विकी क्षीरसागर, शशिकांत पवार, डॉ.मधुकर आढाव, संदीप जगदाळे, एम.डी. काळे, निवास पडळकर, गौतम मोरे, वसंत वाघमारे, जितेंद्र बनसोडे, अक्षय नाईक, निवास पडळकर,नितीन खेडकर,अरविंद सोनटक्के, अशोक निकम,प्रदीप कासुर्डे, राजेंद्र पंडित कार्यकर्ते उपस्थित होते. पाऊस,तसेच मेगा ब्लॉक इत्यादी प्रतिकूल परिस्थिती अडून देखील या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला

# शिव प्रतिष्ठानच्या वतीने नेरे येथील गिरीजा फॉउंडेशन अनाथाश्रम मध्ये धान्य व खाऊचे वाटप

उरण दि १९ शिव प्रतिष्ठानच्या वतीने पनवेल तालुक्यातील नेरे येथील गिरीजा फॉउंडेशन अनाथाश्रम मध्ये धान्य व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सत्यजित पाटील,सुषमा मयेकर, प्रियांका ठाकूर, संदीप पाटील, राकेश कुसळे, अविनाश ठोसर, सुरेश बार्वे, अमर सावंत, राजेश शेलार, दीपक, ओंकार, शशांक, आदी मान्यवर उपस्थित होते.या सामाजिक उपक्रमावेळी संस्थेचे अध्यक्ष सत्यजित पाटील यांनी रायगड मधिल सर्व अनाथ आश्रमा मध्ये प्रत्येक सामाजिक संस्थानी अन्न धान्य किंवा काही आर्थिक मदत देण्याचे उपक्रम राबविले पाहिजे तरच अनाथ मुलांना पुढील आयुष्यासाठी मदत होईल. यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन अनाथाश्रम मधील मुलांना सहकार्य करावे असे आवाहन केले.शिवप्रतिष्ठान करंजाडे या संस्थेच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक समाजउपयोगी उपक्रम राबविण्यात आले आहेत. सामाजिक बांधिलकी जपत शिवप्रतिष्ठान सामाजिक संस्थेने अनाथाश्रम मध्ये अन्न धान्य व खाऊ वाटप केल्याने आश्रमातील मुलांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.यावेळी विद्यार्थ्यांनीही या उपक्रमास प्रतिसाद देत आपल्या भावना व्यक्त केल्या.

# वसई-विरारमध्ये अतिवृष्टीमुळे पूरस्थिती; 30 नागरिकांची यशस्वी सुटका

वसई-विरार :शहरात सुरू असलेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे अनेक भागांत पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून काही ठिकाणी घरांत पाणी शिरल्याने रहिवाशांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.या आपत्ती काळात वसई-विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभाग पूर्णपणे सुसज्ज असून बचावकार्य तातडीने सुरू आहे. सोमवारी बोइदापाडा, राजौरी परिसरात पाण्याच्या प्रवाहात अडकलेल्या तब्बल ३० नागरिकांची मनपा अग्निशमन दलाने शर्थीच्या प्रयत्नांतून सुटका केली. या सर्वांना सुरक्षित ठिकाणी हलवून आवश्यक ती मदत पुरवण्यात आली आहे.स्थानिक नागरिकांनी अग्निशमन विभागाच्या तत्परतेचे कौतुक केले असून प्रशासनानेही पुढील काही दिवस सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. हवामान खात्याने अजूनही मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने नागरिकांनी शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, अशा सूचना पालिका प्रशासनाने दिल्या आहेत.

# देशभक्ती, ईश्वरभक्ती आणि ज्ञानभक्ती यांचा सुरेख संगम- डॉ. लक्ष्मण शिवणेकर

चिंचवड, पुणेः 79 व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आयोजित केलेले राष्ट्रभक्ती महाकविसंमेलन व रक्तदान शिबिर सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि पोलीस खात्यातील अधिकारी तसेच राजकीय नेत्यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी डॉ. लक्ष्मण शिवणेकर हे प्रमुख अतिथी होते. चिंचवड-चिखली जाधववाडी येथील श्री संत सावता महाराज मंदिराच्या सभामंडपात रक्तहितवर्धिनी सामाजिक संस्थेच्या वतीने राष्ट्रभक्ती महाकविसंमेलन



आणि रक्तदान शिबिराचे आयोजन १५ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. जन्माष्टमी (दहीहंडी) आणि भारताचा स्वातंत्र्य दिवस या पवित्र पर्वप्रसंगी आयोजित देशभक्ती (कर्मयोग), ईश्वरभक्ती (भक्तियोग) आणि ज्ञानभक्ती (ज्ञानयोग) यांचा सुरेख संगम झाल्याचा प्रत्यय आला असल्याचे प्रशंसोद्गार संमेलनाच्या समारोपप्रसंगी बोलताना डॉ. लक्ष्मण शिवणेकर यांनी काढले. शेवटी गझल सादर करून आनंद व्यस्त करताना आयोजक ॲड. रमेश अण्णा उंबरगे, नितीन चिलवंत , शिवकुमार बायस आणि सहकार्‍यांचे अभिनंदन आणि कौतुक केले. कार्यक्रमाची सुरुवात गौमातेचे पूजन, संत सावता महाराज, संत बसवन्ना आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तींना पुष्पहार अर्पण करून सामुदायिक शिववंदनेने झाली. डॉ. लक्ष्मण शिवणेकर यांनी दहीहंडीच्या निमित्ताने गोमातेचे पूजन करून ग्रंथहंडी साजरी करून ज्ञानभक्तीचा संदेश दिला. संत तुकाराम महाराजांची गाथा, ज्ञानेश्वरी आणि संतवचन ग्रंथ या पवित्र ग्रंथांची टाळ-मृदंगाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली.मान्यवर वारकरी संप्रदाय तसेच पोलीस अधिकाऱ्यांच्या हस्ते आयोजकांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# शालार्थ प्रणालीत कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मुदतवाढ मिळावी!

## व गहाळ कागदपत्रांच्या शालेय अभिलेख्यावरून साक्षांकित प्रती अपलोड करण्यास परवानगी द्यावी- मराठवाडा शिक्षक संघाचे निवेदन!

छत्रपती संभाजीनगर (दिनांक 19 ऑगस्ट): शालार्थ प्रणालीत कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी व गहाळ कागदपत्रांच्या शालेय अभिलेख्यावरून साक्षांकित प्रती अपलोड करण्यास परवानगी देण्यात यावी अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षणमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे व छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकुंद यांची भेट घेऊन त्यांच्या मार्फत शासनास निवेदन दिले. मराठवाडा शिक्षक संघाने पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की शालार्थ 2.0 मधे शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रथम नियुक्ती आदेश, वैयक्तिक मान्यता, रूजू रिपोर्ट आणि शालार्थ आयडी आदेश अपलोड करणे सुरू आहे. सुरवातीला दोन हजार बारा नंतर शालार्थ आयडी मिळालेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कागदपत्र अपलोड करण्यास सांगण्यात आले होते परंतु नंतर सरसकट सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कागदपत्र अपलोड करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वीस किंवा त्याहून अधिक सेवा झालेल्या अनेक शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक शाळात बदल्या झालेल्या आहेत, अनेक शाळेत मुख्याध्यापक बदलले आहेत, अनेक संस्थेमधे संस्थांतर्गत वाद आहेत व मुळ कागदपत्र संस्थाचालकांकडे



आहेत, अनेक शिक्षक समायोजनाने दुसरीकडे गेले आहेत. पहिले संस्थाचालक त्यांना कागदपत्र देत नाहीत. अशा अनेक कारणांमुळे मुळ कागदपत्रे मिळण्यात अनंत अडचणी येत आहेत. त्यामुळे शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे शारिरीक, आर्थिक व मानसिक स्वास्थ बिघडले असून त्याचा अध्यापन प्रक्रियेवर विपरीत परिणाम होत असल्याचे म्हटले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, शिक्षणातील बोगसगीरी पकडण्यासाठी हे जर सुरु असेल तर ‘दुखणं हाल्याला व इंजेक्शन पखाली’ला असाच हा प्रकार आहे. शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या अखत्यारीत वेतन व भनिनि पथक कार्यालयातून दरवर्षी वेतन घेणाऱ्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या, यादी व शासनाने भरतीस परवानगी दिलेली शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या जरी पडताळून पाहिली तरी हा घोटाळा उघडा पडतो. परंतु त्यासाठी सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यास मुळ नियुक्ती आदेश, रूजू रिपोर्ट व वैयक्तिक मान्यता मागणे हास्यास्पद आहे. त्यामुळे राज्यातील शिक्षक वर्ग परेशान झालेला आहे. त्यांच्यामधे असंतोष निर्माण झालेला आहे. याची दखल घ्यावी.शालार्थ प्रणालीत कागदपत्रे अपलोड करण्यासाठी सप्टेंबर 2025 अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. मूळ कागदपत्र गहाळ असतील वा मिळत नसतील तर शालेय अभिलेख्यावरून अशा कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती अपलोड करण्यास परवानगी देण्यात यावी, अप्रिय घटना टाळाव्यात अन्यथा तीव्र आंदोलनाचा ईशारा मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, कोषाध्यक्ष ए बी औताडे,उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे, छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण, बाळू पवार, नवनाथ मंत्री,सुंदर कदम, एस एस घायाळ, बी बी सोंडगे, बी एम कदम, बी ए गवळी, बी बी गवळी , एच बी घायाळ ,ए एन मुळे, एस एस गव्हाणे यांनी दिला आहे

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com